# "सिमरन"

# Life Without Regrets

हे पुस्तक मी लिहिले ते माझ्या पणतीसाठी..सिमरनसाठी आणि तिच्या वयाच्या नवीन पिढीसाठी.'सिमरन 'ही तिच्या पिढीची चालती बोलती प्रतिनिधी आहे.या सर्व मुलांची एकेक वेगळी वेगळी गोष्ट असते. या पिढीसाठी हा जो मी प्रयत्न केला आहे तो फक्त "सिमरन"ची ओळख करून देण्यापुरता नसून, या मुलांनी आपल्या कुटुंबाची माहिति मिळवून, आपल्या वाडवडिलांनी जो आपल्या संस्कृतीचा, आचारविचारांचा वारसा ठेवला आहे त्याची जाणीव करून देण्याचा आहे.

या देशांत प्रथम आलेले आपले आईवडील कसे होते, ते कोणत्या दिव्यांतून-त्रासांतून पार पडले असतील याची थोडीशी कल्पना यावी, तसेच त्यांचे आजी आजोबा कुठे आणि कसे राहिले असतील याची माहिति मिळविण्याच्या उत्सुकतेने ही मुले प्रयत्नशील रहातील ही अपेक्षा.अशाऱ्हेने आपण कुठून आलो याची पक्की जाणीव झाल्यानंतर, या मुलांचा आत्मविश्वास आणि काहीतरी वेगळं करून दाखविण्याची जिद्द वाढीला लागेल अशी उमेद आहे.ही सिमरनची कहाणी हेच सांगत आहे की त्या काळांत आलेल्या कुटुंबानी, आपल्यानंतर येणाऱ्या पिढीसाठी जे कष्ट उपसले, ते पुढच्या पिढीला आपल्यापेक्षा जास्त चांगले आयुष्य घालवायला मिळावे हाच एक उद्देश त्यांच्यापुढे होता.

आता पर्यत्त "सिमरन" पुस्तकाला जो प्रतिसाद मिळाला त्यांतून असा विचार मनांत आला की विक्रीच्या किमतींतून झालेले सर्व उत्पन्न महाराष्ट्रांतील अपंगांच्या संस्थाना देणगी म्हणून द्यावे.या कल्पनेतून " सिमरन व्हिलचेअर योजना"निर्माण झाली. पुण्यांतून सौ.नीला ढवळे या योजनेत सामील झाल्या आहेत आणि मदत करीत आहेत.

'सिमरन' पुस्तक विकत घेतल्याने आपण आम्हाला सक्रीय पाठिंबा देत आहांत हे आम्हाला मान्य आहे.पण हे पुस्तक घेण्यांत तुमचा दुहेरी फायदा आहे.एकतर पुस्तक वाचण्याचा आनंद आहे आणि दुसरं म्हणजे या आयुष्याच्या प्रवासांत तुम्ही एका अपंग माणसाचे आयुष्य थोडफार सुखकर करीत आहांत.

धन्यवाद.

दिवाकर ( दादा )कारखानीस

**Simran** (English version)

Available at:

Dada Karkhanis
Price: $7.00
104 Grand Falls Ct., Dickinson, TX 77539
E-mail: dkarkhan80@gmail.com